# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


**स्मरणपत्र २:**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/ 2096
दिनांक : 22 MAY 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
**सांगली जिल्हयातील** व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय /
अशासकीय अनुदानित व विना अनुदानित सस्था.
(सांगली जिल्हा).

**विषय :- ३३ कोटी वृक्षलागवड २०१९ बाबत...**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे स्मरणपत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/१८९२, दि. ४/५/२०१९.
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/१७८४, दि. १५/४/२०१९
३. सदस्य सचिव, जिल्हा वृक्ष लागवड अधिकारी, तथा उपवनसंरक्षक, वन विभाग सांगली यांचे पत्र जा.क्र./योजना/३३ कोटी/२०१८-१९/१०२, दिनांक १८/०४/२०१९.
४. महसूल व वन विभागाचे पत्र क्रमांक : साबवि/-२०१८/प्र.क्र./१४४/फ-११, दि. ०६/०९/२०१८.

या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सांगली जिल्हयातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांप्रमुखांना या पत्राव्दारे कळविण्यात येते की, ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रम अंतर्गत सन २०१९ करीता, शासनाने आपल्या तंत्र शिक्षण विभागास सांगली जिल्हयासाठी **एकूण १६०७५** इतकी रोपे लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आलेले असल्याचे, सदस्य सचिव, जिल्हा वृक्ष लागवड अधिकारी तथा उपवनसंरक्षक, वन विभाग सांगली यांनी वरील संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे.

त्यास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाने, सदरची उद्दिष्टपूर्ती होण्याच्या दृष्टीने सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे सांगली जिल्हयातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थाना, संस्थानिहाय वृक्षलागवडीचे उद्दिष्ट नेमून देण्यात आले असल्याचे व त्यानुसार सदर रोपे लागवडीसाठी आवश्यक खड्डे खोदून त्याचा अहवाल सोबत जोडलेल्या विहित **प्रपत्र-२ मध्ये** भरुन तसेच **खोदलेल्या खड्डयांचे प्रत्येक साईटचे फोटो व १० सेकंदाचा व्हिडिओ** संबंधित कार्यालयाच्या ई-मेल आयडी **dycfsangli@gmail.com** वर तसेच या कार्यालयाच्या **info.ropune@gmail.com** ई-मेल वर **Soft Copy व PDF मध्ये दिनांक २७/०४/२०१९ पर्यंत न चुकता पाठवावे असे सर्व संस्थांना** वरील संदर्भ क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले होते.

तथापि उद्दिष्ट नेमून दिलेल्या ब-याच संस्थांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे वृक्ष लागवड करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही केली नसल्यामुळे, संबंधित सर्व संस्थांना वरील संदर्भ क्र. १ येथील स्मरणपत्र-१ अन्वये, दिनांक ०५/०५/२०१९ पर्यंत आवश्यक कार्यवाही करण्याकरीता पुन्हा कळविण्यांत आलेले होते.

परंतु काही संस्था वगळता ब-याच संस्थांनी वृक्षलागवड करण्याबाबत दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याकरीता अजूनही आवश्यक खड्डे खोदून त्याचा अहवाल सोबत जोडलेल्या विहित **प्रपत्र-२ मध्ये** भरुन तसेच **खोदलेल्या खड्डयांचे प्रत्येक साईटचे फोटो व १० सेकंदाचा व्हिडिओ** संबंधित कार्यालयाच्या ई-मेल आयडी **dycfsangli@gmail.com** वर तसेच या कार्यालयाच्या **info.ropune@gmail.com** ई-मेल वर **Soft Copy व PDF मध्ये सादर केलेला नाही हे अत्यंत खेदजनक आहे.**

दिनांक ०६/०५/२०१९ रोजी, मा. जिल्हाधिकारी महोदय याबाबत आढावा बैठक घेतली असून, दिलेल्या उद्दिष्टानुसार पूर्तता करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. सुलभ संदर्भासाठी सदर बैठकीच्या इतिवृत्ताची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. पुढील आढावा बैठक मे महिन्याच्या शेवटच्या आठवडयात घेण्यात येणार असल्याने, तत्पूर्वी वरीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी असे सर्व संस्थाप्रमुखांना आवाहन करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

२२/५/१९

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :
१. सदस्य सचिव, जिल्हा वृक्ष लागवड अधिकारी तथा उपवनसंरक्षक, वन विभाग सांगली यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२. या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

**विषय-** ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रम अंतर्गत दिनांक.०८/०७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

१. डॉ.श्री. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी, सांगली
२. श्री. प्रमोद भि. धानके, उपवनसंरक्षक (प्रा) सांगली.
३. श्रीमती किरण कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी (रोहयो), सांगली
४. श्री. विक्रांत बगाडे, अतिरिक्त,मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सांगली.
५. श्री. एस.आर. काटकर, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (पश्चिम), सांगली
६. श्री. एम.एस. कुलकर्णी, कृ.उ.सं. प्रतिनिधी जिल्हा कृषी अधिक्षक, सांगली
७. श्री. नितीन कोळेकर, महाव्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र, सांगली
८. श्री. ए. एस. शिंदे, प्रतिनिधी -राज्यकर अधिकारी, जी.एस.टी., सांगली
९. श्री. एस.पी.साळे, प्रतिनिधी- समाज कल्याण, सांगली
१०. श्री. एम.एन.उचगांवकर, प्रतिनिधी- उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली
११. डॉ एस.एस.भावे, प्रतिनिधी- वैदयकीय जिल्हा आरोग्य अधिकारी,सांगली
१२. श्री. वसंत नि. इंगळे, प्रतिनिधी- वैदयकीय शिक्षण विभाग, पदमभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय सांगली
१३. श्री.एस.ए. कोरे, वृक्ष अधिकारी, सांगली,मिरज आणि कुपवाड महानगरपालिका
१४. श्री. गो.सु.पुनसे, अतिरीक्त कार्यकारी अभियंता(स्थापत्य), उपविभाग सांगली महावितरण
१५. श्री. आर.बुचडे, जिल्हा ग्रामोदयोग अधिकारी, सांगली
१६. श्रीमती एस.पी.धुमाळ, शिक्षण विस्तार अधिकारी, जि.प. सांगली
१७. श्री. इ.एम. सावरे, उपअभियंता म्हाडा, सांगली
१८. श्री. दिपक झिंजाड, मुख्याअधिकारी, नगरपरीषद इस्लामपूर
१९. श्री. गणेश कारभारी शिंदे, मुख्यअधिकारी, नगरपरीषद तासगांव
२०. श्रीमती शिल्पा दरेकर, जि.प्र.अ.न.प.शाखा जिल्हा अधिकारी कार्यालय सांगली
२१. श्री. माणिक वाघमारे, जिल्हा क्रिडा अधिकारी, सांगली
२२. श्री. बी.ए.पोळ, विभागीय वनअधिकारी, सांगली
२३. डॉ. एस.ए. धकाते, जिल्हा उपायुक्त पशूसर्वधन राज्य,सांगली
२४. डॉ.एल.एन.सुपने, प्रतिनिधी- जिल्हा परीषद पशूसंर्वधन, सांगली
२५. श्री. ह. मनधन, उप सा. अभियंता- प्रतिनिधी- सांगली पाटबंधारे विभाग, सांगली
२६. श्री. व्हि.एम.पुजारी, सहाय्यक अभियंता,प्रतिनिधी- MIDC, सांगली
२७. श्री. अशोक कृष्णा कुभांर, मुख्याधिकारी, नगरपरीषद, शिराळा
२८. श्री. महेश सा. शिर्के, मुख्याधिकारी, विटा,खानापूर, पलूस नगरपालिका
२९. श्रीमती एस.एस. बस्तवडे, विस्तार अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, जि.प.सांगली
३०. श्री.ए.एन.वाघ, उप कार्यकारी अभियंता,प्रतिनिधी- सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज
३१. श्री. एल.एस.भड, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली
३२. श्री.डि.पी. घेवडे प्रतिनिधी- माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परीषद सांगली
३३. कु. आर.एच. मुजावर, अनुरेखक, टेंभू उपसा सिंचन, तासगांव

Scanned by CamScanner

३४. श्रीमती एम.डी. जोशी, निरीक्षक,प्रतिनिधी- जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, सांगली

३५. श्री. रामकृष्ण वि. राऊत, प्रतिनिधी- सहाय्यक कामगार आयुक्त,सांगली

३६. श्री. आर.बी.कांबळे, सहाय्यक निरीक्षक,जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,सांगली

३७. श्री.आर.एम.कांबळे, (SI), नगरपरीषद आष्टा

३८. श्री.टी.ए.शिर्के, प्रतिनिधी- जिल्हा रेशीम कार्यालय, सांगली

३९. श्री. वसीम मुजावर,प्रतिनिधी- रेल्वे, सहाय्यक मंडळ, इंजिनियर, मिरज

४०. श्री.टी.एच.पाटोळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, सांगली

४१. श्री. शि.ग. गोसावी, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, विटा

४२. श्री.लालासाहेब मारुती देसाई, पतिनिधी-विभाग नियंत्रक, परीवहन विभाग,सांगली

४३. श्री. राधाकिसन देवढे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.प.सांगली

सन २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम पूर्वतयारी व नियोजन सर्व शासकीय विभागाचे अधिकारी समवेत जिल्हाधिकारी सांगली यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि.०६ मे २०१९ रोजी च्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

| अ. क्र | विषय | निर्णय | अंमलबजावणीस संबधित यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | ३३ कोटी वृक्ष लागवड - स्थळ निश्चिती. | शा.नि.दि.०६ सप्टेंबर २०१८ चे निणर्यानूसार वाटप करण्यात आलेल्या रोप लागवडी उद्दिष्टाच्या अनूषगांने रोप लागवडीकरीता ज्या यंत्रणानी अदयाप स्थळ निश्चिती केलेली नाही. त्या संबधित यंत्रणानी तात्काळ स्थळ निश्चिती करुन अक्षांश व रेखांश सह स्थळ निहाय माहिती सदस्य सचिव, जिल्हास्तरीय वृक्षलागवड समिती, तथा उपवनसंरक्षक सांगली यांच्या कार्यालयास पाठवावी. | संबधित यंत्रणा |
| २ | ३३ कोटी वृक्ष लागवड - खड्डे खुदाई . | नगरविकास विभाग (इस्लामपूर, विटा, आष्टा, तासगांव, जत, पलूस, खानापूर, कवठेमहांकाळ, कडेगांव, शिराळा), बांधकाम विभाग, वाहतूक नियंत्रण विभाग या विभागानी खोदलेल्या खड्यांची संख्या अंत्यंत कमी (५०% पेक्षा कमी) असलेने सदर बाब अंत्यत असमाधानकारक आहे. संबधित विभागाने उद्दिष्टानूसार प्रतिदिन खड्डे खोदण्याचे नियोजन करावे. नियोजन करुन २५ मे २०१९ पूर्वी संपूर्ण खड्डे खोदण्याची कार्यवाही पूर्ण करावी.<br>तसेच इतर विभागाचे खड्डे खोदणेचे उद्दिष्ट तात्काळ पूर्ण करुन घ्यावे. | सर्व यंत्रणा |
| ३ | रोपवन स्थळे जिओ मॅपिंग करणे (अक्षांश/रेखांश). | यंत्रणानी निवड केलेली रोपवपन स्थळे व रोपवन स्थळांवर खोदलेल्या खड्डयांचे जिओ टॅग छायाचित्र (अक्षांश/रेखांश सह) व व्हिडिओ तात्काळ वनविभागाच्या www.greenarmy.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर त्वरीत अपलोड करावेत. | सर्व यंत्रणा |
| ४ | खड्डे खुदाई कामाचे क्रॉस चेकिंग करणे. | विभाग निहाय खोदणेत आलेल्या खड्डयांचे तपासणीकरीता अंतरविभागीय तपासणी चमूचे गठन करुन सर्व विभागानी खोदलेल्या खड्डयाची तपासणी करावे. | १.उपवनसंरक्षक सांगली<br>२.उपजिल्हाधिकारी (रोहयो) |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सांगली |
| ५ | रोपे उपलब्धता. | सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडे ग्रामपंचायत विभाग यांनी व वनविभाग यांचेकडे इतर यंत्रणा (कृषी व रेशीम विभाग वगळून) यांनी विहित प्रपत्रात वनक्षेत्रपाल वनविभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या कार्यालयात रोपे मागणी करावी.<br>वनविभाग व सामाजिक वनीकरण यांनी तालूका स्तरावरुन रोपे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी.<br>कृषी व रेशीम विभाग त्यांचे स्तरावरुन लाभार्थी यांना रोपे उपलब्ध करुन देणेची कार्यवाही करावी. | १. सामाजिक वनीकरण, विभाग सांगली<br>२. वनविभाग सांगली<br>३. कृषी विभाग सांगली<br>४. रेशीम विभाग सांगली.<br>५. इतर सर्व यंत्रणा |
| ६ | नगरविकास विभाग व ग्रामविकास विभाग रोप लागवड उद्दिष्टाबाबत. | नगरविकास विभाग यांनी त्यांचे विभागाकडून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत यांचे वर्गवारी नूसार रोप लागवडीची उद्दिष्ट वाटप करण्यात आल्याचे अध्यक्षांचे निदर्शनास आणून दिले. त्या अनूषगांने शा.नि. ६ सप्टेंबर २०१८ च्या निर्णयान्वये व नगरविकास विभाग यांचे शासन निर्णयान्वये कार्यवाही करुन विभागास देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत निर्देश दिले.<br>शा.नि. ६ सप्टेंबर २०१८ च्या निर्णयान्वये ग्रामविकास विभागास (ग्रामपंचायत वगळून) देण्यात आलेले उद्दिष्ट ग्रामविकास अंतर्गत विविध विभागाकडून पूर्ण करणेबाबत सूचना दिल्या. | १. नगरविकास विभाग<br>२. ग्रामपंचायत विभाग |
| ७ | रोप लागवड तंत्र प्रात्यक्षिक कार्यशाळा आयोजित करणे. | रोप लागवडीबाबत तालूका स्तरावर सर्व यंत्रणांची प्रात्यक्षिक स्वरुपात कार्यशाळा आयोजित करुन रोप लागवडीबाबत सर्व यंत्रणेचे नोडल अधिकारी यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण दयावे. | १.वनविभाग सांगली<br>२. सामाजिक वनीकरण, विभाग सांगली |
| ८ | हरीतसेना सदस्य नोंदणी. | शा.नि. दि.०७/०९/२०१८ चे शासन निर्णयान्वये जिल्हयातील इतर यंत्रणा निहाय (वनविभाग वगळून) महाराष्ट्र हरीतसेना सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट वाटप करण्यात आले आहे. त्याअनूषगांने आजअखेर(वनविभाग वगळून) ऑनलाईन नोंदणी पूर्ण करणेबाबत सादरीकरणा व्दारे दिलेल्या माहिती नूसार सदस्य नोंदणीची कार्यवाही पूर्ण करावी. | सर्व यंत्रणा (वनविभाग वगळून) |
| ९ | इतर सूचना. | सर्व यंत्रणानी उद्दिष्ट निहाय निवड केलेली रोपवन स्थळांची यादी वनविभागाच्या कार्यालयास पाठवावी.<br>सर्व विभाग यांनी रोपवन कार्यक्रमांत सन्मा. लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, नागरीक, विदयार्थी यांचा मोठया प्रमाणात सहभाग घेवून रोपवन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडणेबाबत नियोजन करावे. आयोजित केलेल्या कार्यक्रमाची प्रत सदस्य सचिव, जिल्हास्तरीय वृक्ष लागवड समिती यांच्या कार्यालयास पाठविण्यात यावी. | सर्व यंत्रणा |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | रोपे लागवडीकरीता दर्जेदार उंच रोपांची निवड करावी. व रोपांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करावी. | |
| | | महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात रोपांच्या प्रभावी संरक्षणसाठी प्रत्येक रोपाला ट्री गार्डची व्यवस्था करावी. तसेच ज्या विभागांना रोपांचे संरक्षण करणे करीता ट्री गार्ड ची व्यवस्था करणे शक्य आहे त्या विभागानी आवश्यक कार्यवाही करावी. | नगरविकास विभाग<br>इतर सर्व विभाग |
| | | • महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील शहरी भागात खुल्या जागा निवडून गट लागवड करण्यात यावी.<br>• अर्बन फॉरेस्ट हि संकल्पना राबविण्यात यावी.<br>• स्मृती उदयान तयार करणे<br>• लेकीच झाड, जन्म-मूत्यू नोंद, विवाह नोंदीचे वेळी एक रोप पूरवून जोपसाना करणेसारख्या नवीन संकल्पना अंमलात आणाव्यात.<br>• "प्रती कुटुंब एक रोप " हि संकल्पना राबवून जास्तीत जास्त नागरीकांना सहभागी करुन घ्यावा. | ग्रामविकास विभाग<br>नगरविकास विभाग |
| १० | जिवंत रोपांची टक्केवारी | २,४,१३ कोटी वृक्ष लागवड अभियान अंतर्गत जिवंत रोपांची टक्केवारी उपवनसंरक्षक (प्रा) वन विभाग सांगली यांना कळविण्यात येऊन त्यांची ऑनलाईन नोंद संकेतस्थळावर नोंद करणेत यावी. | सर्व यंत्रणा |

वरील निर्देशाप्रमाणे सर्व विभाग प्रमुखांनी दिलेल्या उद्दिष्टानूसार पूर्तता करणेबाबतची आवश्यक कार्यवाही करावी. उपस्थितीताचे आभार व्यक्त करुन सभेची सांगता करण्यात आली. पुढील आढावा बैठक मे महिन्याच्या शेवटच्या आठवडयात घेण्यात येईल.

जिल्हाधिकारी सांगली करीता

Scanned by CamScanner

## प्रपत्र 2

| अ.नं | विभाग/यंत्रणेचे नाव | तालुका | गाव | क्षेत्र (हे) | क्षेत्र कि.मी. | जागेचा तपशिल गट नं./स.नं. | अक्षांश | रेखांश | नियोजित रोप लागवड संख्या | खड्डे खुदाई | साईड समन्वयक अधिकारी नांव व पदनाम | साईड समन्वयक अधिकारी मोबाईल नंबर | नियंत्रण अधिकारी नांव व पदनाम | नियंत्रण अधिकारी मोबाईल नं | नियंत्रण अधिकारी ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |